रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

'विधी'-लिखित

कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका

९

तोंडी तिहेरी तलाक निवाडा

समानतेचा सांगावा



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा

विजया रहाटकर

सदस्य

नीता राजेंद्र ठाकरे

सदस्य

गयाताई शिवाजीराव कराड

सदस्य

देवयानी ठाकरे

सदस्य

विंदा कीर्तीकर

सदस्य

ॲड. आशा लांडगे

पदसिद्ध सदस्य

सतीश माथूर
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव

डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे मुखपत्र

साद



दरमहा प्रकाशित

प्रकाशक
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
म्हाडा भवन, कलानगर,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१
दूरध्वनी (०२२) - २६५९०७३९

मुखपृष्ठ, मांडणी
साहिल पब्लिकेशन
सुनील पाटील, वंदन पाटील
आनंदनगर, सिंहगड रोड.
९९२२९१३५८०, ९०११०८७४२९

मुद्रक
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परेल, मुंबई–१३

प्रथम आवृत्ती
मे २०१८

किंमत
संपूर्ण पुस्तक संच : १०० रूपये
प्रति पुस्तक : १० रूपये

'विधी'-लिखित
कायदेविषयक जनजागृतीसाठी
महाराष्ट्र राज्य महिला
आयोगाची पुस्तकमालिका
१

महत्वाची सूचना :
महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तिकेत सर्वसामान्यांना, विशेषतः महिलांना कायद्याची माहिती सुलभ भाषेत व्हावी, यासाठी हा मजकूर प्रकाशित करण्यात आला आहे. हा मजकूर म्हणजे मूळ कायद्याचा शब्दशः तर्जुमा नव्हे. कुठल्याही कायद्याचा अर्थ, अन्वयार्थ यासाठी मूळ इंग्रजी मसुदा व त्याचा अर्थच ग्राह्य धरला जाईल, याची वाचकांनी व संबंधितांनी नोंद घ्यावी.

– प्रकाशक

भूमिका

प्रिय मैत्रिणींनो,
सस्नेह नमस्कार,

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने प्रकाशित मालिकेतील ही नववी पुस्तिका आपल्या हातात देताना मला मनःपूर्वक आनंद होत आहे. तोंडी तीनदा तलाकचा विषय देशात सध्या चांगलाच गाजतो आहे. मुस्लिम महिला संघटनांनी ही प्रथा बंद करण्यासाठी देशभर संघटितपणे लढा उभारला आहे. शहाबानो ते शायरा बानो असा या प्रश्नाचा प्रवास झाला आहे. अर्थात, हा प्रश्न आत्ताच उपस्थित झालेला नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच या प्रथेविरोधात आवाज उठवला गेला आहे. दुसरीकडे धार्मिक बाब म्हणून या प्रश्नात हस्तक्षेप करू देण्यास मुस्लिम धर्मातीलच एका गटाचा विरोध आहे, सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नावर नुकताच ऐतिहासिक निर्णय दिला असून, ही प्रथा रोखण्यासाठी केंद्र सरकारला कायदा करण्यास सांगितले आहे. हा प्रश्न नेमका काय आहे, याचे काही एक विवेचन सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात केले आहे. सध्याच्या वादवादंगांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय समजून घेणेही अगत्याचे आहे. त्यासाठीच या निर्णयाचा गोषवारा सुलभ मराठीत आणण्याचा आयोगाचा हा प्रयत्न आहे.

देश स्वतंत्र होऊन सत्तर वर्षे उलटून गेली असली आणि आपण आज एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात असलो, तरी तोंडी तलाकसारखे प्रश्न आजही पल्या समाजाला भेडसावत आहेत. तसेच, त्यातून मुस्लिम भगिनींना आजही असुरक्षिततेस, सामाजिक अवहेलनेस सामोरे जावे लागते आहे. जगातील मुस्लिम देशांनी व मुस्लिम बहुसंख्या असलेल्या देशांनी कोणतीही खळखळ न करता या प्रथेला कायदेशीर बंदी घालून मुस्लिम महिलांना सामाजिक सुरक्षा पुरवण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. या पार्श्वभूमीवरही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचे एक महत्त्व आहे. त्यामुळेही हा निकाल सारांशाने का होईना समजून घेणे महत्त्वाचे आहे. जबाबदार लोकशाही देश म्हणून महिलांना समानतेची, आदराची, सन्मानाची वागणूक देणे हे आपले कर्तव्य आहे. घटनेनेही ते उद्दिष्ट निश्चित केले आहे. ते साध्य करण्यासाठी आपल्याला अजून किती व कसे प्रयत्न करावे लागणार आहेत, हेही यानिमित्ताने समजून येईल. त्यासाठीही ही पुस्तिका महत्त्वाची ठरू शकेल. महिलांना सक्षम करण्यासाठी अशा पुस्तिकांची गरज असून, त्यांच्या सक्षमतेसाठी आवश्यक असणारी माहिती त्यांच्यापर्यंत पोचवणे, हाच या पुस्तिकांच्या प्रकाशनामागचा हेतू आहे.

'तोंडी तिहेरी तलाक निवाडा : समानतेचा सांगावा' या पुस्तिकेत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा परिचय करून देण्यात आला आहे. तो आपल्याला उपयुक्त वाटेल, अशी आशा करते.

विजया रहाटकर, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

तलाक ए बिद्दत

तोंडी तिहेरी तलाक...

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा घोषवारा

खटल्याचा तपशील

रिट पिटीशन (सी) नं. ११८...२०१६
शायरा बानो (वादी) विरुद्ध भारत सरकार व अन्य
मुस्लिम विमेन्स क्रेस्ट फॉर इक्वॅलिटी (वादी) विरुद्ध जमायत उलेमा ए हिंद (प्रतिवादी)
आतिया साबरी (वादी) विरुद्ध केंद्र सरकार व अन्य (प्रतिवादी)
आफ्रिन रहमान (वादी) विरुद्ध केंद्र सरकार (प्रतिवादी)
गुलशन परवीन (वादी) विरुद्ध केंद्र सरकार (प्रतिवादी)
इशरत जहाँ (वादी) विरुद्ध केंद्र सरकार (प्रतिवादी)

सरन्यायाधीश जे. एस. खेहर व न्या. एस. अब्दुल नझीर यांच्या खंडपीठाचा निवाडा

या खटल्यातील प्रतिवादी, अलाहाबादमधील रिझवान अहमद यांनी १०.१०.२०१५ रोजी तीनदा तलाक म्हणत आपल्याला अचानकच तलाक दिला. यावेळी मोहंमद यासीन आणि अयाज अहमद हे दोन साक्षीदार उपस्थित होते. त्या दिवसानंतर पती रिझवान अहमद यांच्याशी आपला कोणताही संबंध राहिलेला नाही. पती रिझवान यांनी मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट, १९३७ च्या कलम २ नुसार अचानकच आपला विवाह संपुष्टात आणला. हा तलाक अवैध ठरवला जावा, अशी मागणी शायरा बानो यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे.

पती रिझवान यांनी दिलेला तलाक ई बिद्दत (तिहेरी तलाक) घटनाविरोधी आहे. शरियतमध्येही तशी तरतूद नसल्याने तीनदा तलाक म्हणून अचानकच विवाह संपुष्टात आणणे शरियतच्या विरोधातील कृती आहे. तसेच, घटनेच्या १४, १५ आणि २१ या कलामांनी नागरिकांना बहाल केलेल्या मूलभूत हक्कांचीही पायमल्ली यामुळे झाली आहे. घटनेच्या २५ (१), २६ (ब) आणि २९ या कलमांनी नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य दिले असले, तरी या कलमांचा विचार करता तिहेरी तलाकचा त्यात समावेश करता येणार नाही किंवा त्याला धार्मिक बाब म्हणून संरक्षणही देता येणार नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावरही तिहेरी तलाक ही पद्धत नाकारली गेली असून, तीनदा तलाकसारखी प्रथा मुस्लिम धर्माचा भाग असू शकत नाही, असे स्पष्ट करत मुस्लिम देशांनीही यावर बंदी घातली आहे, असे म्हणणेही शायरा बानो यांनी सर्वोच्च न्यायालयात मांडले.

अलाहाबादमध्ये ११.४..२००१ रोजी शरियत कायद्यानुसारच आपला शायरा बानोशी निकाह झाला. मोहमंद इरफान (सध्या वय १३) आणि उमैरा नाझ (सध्या वय ११), अशी दोन मुले आम्हाला झाली. ९.४. २०१५ रोजी शायरा बानो यांनी आपल्या दोन्ही मुलांसह अचानकच आपले घर सोडले आणि त्या वडिलांच्या घरी जाऊन राहिल्या. शायरा बानो यांना पुन्हा घरी आणण्यासाठी मी वारंवार प्रयत्न केले. तथापि, त्यांनी घरी येण्याचे नाकारले. आपली मुलगी सासरी नांदू इच्छित नाही, असे शायरा बानो यांच्या वडिलांनी नंतर आपल्याला कळवले,. असे म्हणणे रिझवान अहमद यांनी न्यायालयासमोर मांडले. अलाहाबादमधील कुटुंब न्यायालयातही आपण धाव घेतली होती. मात्र, त्यानंतरही शायरा बानो पुन्हा घरी न परतल्याने आपण शायरा बानो यांना १०.१०.२०१५ रोजी तलाक दिला. हा तलाकनामाही रिझवान अहमद यांनी सर्वोच्च न्यायालयापुढे मांडला. शायरा बानो यांना पूर्ण कल्पना देऊनच आपण त्यांना तलाक दिला आहे. तसेच, सुन्नी मुस्लिमांमधील हनाफी पंथातील प्रथेनुसार आपण हा तलाक दिला असून, तो शरियतनुसारच (मुस्लिम पर्सनल लॉ) आहे, असेही रिझवान अहमद यांनी न्यायालयास सांगितले.

मुस्लिम समाजातील प्रचलित तलाक पद्धत (भाग २)

प्रचलित इस्लामिक कायद्यानुसार घटस्फोटाचे तीन प्रकार आहेत. तलाक (ज्यात पती पत्नीस घटस्फोट देतो), खुला (ज्यात पत्नी पतीस घटस्फोट देते) आणि मुबारात (दोघांच्या संमतीने विभक्त होणे), असे हे तीन प्रकार आहेत. तलाकमध्येही तलाक ए एहसान, तलाक ए हसन आणि तलाक ए बिद्दत, असे तीन प्रकार आहेत. तलाक ए एहसान व तलाक ए हसन या दोन्ही प्रकारांना कुराण व हदिथची मान्यता असून, तलाक ए एहसान हा सर्वाधिक योग्य व तलाक ए हसन हा योग्य असा प्रकार आहे. तलाक ए बिद्दतला कुराण किंवा हदिथची मान्यताच नाही. त्यामुळे मुस्लिम धर्मातही त्याला मान्यता नसल्याने तलाक ए बिद्दतच्या (तिहेरी तलाक) वैधतेचा प्रश्न न्यायालयापुढे आहे.

तलाक ए एहसान या प्रकारानुसार पती पत्नीला एकदाच तलाक म्हणतो. त्यानंतर पुढील तीन महिन्यांची मुदत पत्नीस दिली जाते. त्यास इद्दत असे म्हणतात. या काळात पती व पत्नीत समेट झाल्यास किंवा त्यांच्यात शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यास त्यांचा निकाह कायम राहतो. इद्दतची मुदत संपल्यानंतरही पती पत्नीत समेट न झाल्यास त्यांचा निकाह संपुष्टात येतो. त्यानंतर दोघांचे पती व पत्नी हे नाते संपुष्टात येते. त्यानंतर या दोघांना पुन्हा निकाह करायचा असल्यास, संबंधित महिलेने दुसऱ्या पुरुषाशी विवाह करायचा. त्याने अशाच प्रकारे तलाक दिल्यानंतर संबंदित महिलेस पहिल्या पतीशी पुन्हा निकाह करता येतो आणि तो धर्मसंमत मानला जातो. मुस्लिम समाजात या प्रकारास सर्वाधिक योग्य मानले जाते. तलाक ए हसन हा तलाक ए एहसानसारखाच प्रकार आहे. मात्र, त्यात पतीने पत्नीस प्रथम तलाक म्हटल्यानंतर पत्नीस एक महिन्याची मुदत दिली जाते. त्या मुदतीत दोघांत समेट न झाल्यास पती पत्नीस दुसऱ्यांदा तलाक म्हणतो. मात्र, या काळात दोघांत समेट झाल्यास किंवा शारीरिक संबंध प्रस्थापित झाल्यास हा तलाक रद्दबातल ठरतो आणि त्यांचा निकाह कायम राहतो. मात्र, या प्रकारातील इद्दतच्या मुदतीनंतर पतीने तलाक दिल्यास त्यांचा निकाह कायमस्वरूपी संपुष्टात येतो. त्यानंतर पुढील तीन नहिने संबंधित महिलेला अन्य पुरुषाशी विवाह करता येत नाही. ही तीन महिन्यांची इद्दत संपल्यानंतरच ती पुनर्विवाह करू शकते. मुस्लिम धर्मात यालाही योग्य प्रकार मानले जाते.

तलाक ए बिद्दतमध्ये अशी इद्दत नसते. तीनदा तलाक म्हणून पती पत्नीला घटस्फोट देतो. पतीने तीनदा तलाकचा उच्चार केला, की त्यांचा निकाह तत्काळ संपुष्टात येतो. मुस्लिम धर्मीयांत या प्रकाराला योग्य मानले जात नाही. या खटल्यातील वादीच्या म्हणण्यानुसार कुराणात तलाक ए बिद्दतची कोणतीही नोंद नाही किंवा त्याचा उल्लेखही नाही. इस्लामच्या उदयानंतर दुसऱ्या शतकात तलाक ए बिद्दतची प्रथा सुरू झाली असावी, असे मानले जाते. सुन्नी मुस्लिमांतील काही थोड्या पंथांतच व त्यातही विशेषत: हनाफी पंथातच या प्रकारास मान्यता आहे. अर्थात, या प्रकारास मान्यता देणाऱ्या पंथांनीही तीनदा तलाकच्या प्रथेस अयोग्य असेच संबोधले आहे, यावर वादी व प्रतिवादीच्या वकिलांचेही एकमत आहे.

कुराण आणि तलाक (भाग ३)

अल्लाने प्रेषित महंमदांना वेळोवेळी जे ज्ञान दिले आणि प्रेषित महंमदांनी ते तसेच वेळोवेळी आपल्या शिष्यांना दिले ते म्हणजे कुराण. सुमारे २३ वर्षे ही प्रक्रिया सुरू होती. प्रेषित महंमदांच्या निधनानंतर त्यांच्या शिष्यांनी प्रेषितांच्या या सर्व विचारांचे संकलन पूर्ण केले. यातील काही विचार लिखित स्वरूपात, तर काही स्मृतींच्या स्वरूपात होते. त्यामुळे साहजिकच त्याबाबत काही मतमतांतरे होती. मात्र, खलिफा उस्मान (तिसरे) यांनी कुराणाची एक सर्वसंमत (स्टँडर्ड) प्रत तयार केली. उस्मान कोडेक्स या नावाने ती ओळखली जाते आणि आज तिलाच प्रमाणित मानले जाते.

हा खटला तलाक ए बिद्दतबाबत असल्याने कुराणातील याच बाबतीतील आयतांचा विचार करणे आवश्यक आहे. कुराणातील शुरा (दोन) मधील कलम २८ मधील २२२ व २२३ या आयतांचा विचार यासाठी करावा लागेल. या आयतांनुसार पुरुषांचे महिलांबाबतचे वर्तन कसे असावे, हे सांगितले गेले आहे. त्यातही महिलांना वाईट वागणूक देऊ नये. उलट त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याचा योग्य तो सांभाळ केला गेला पाहिजे, असेच यात म्हटले आहे. २२४ ते २२८ या आयतांमध्येही याबाबत काही निर्देश आहेत. अविचाराने किंवा कोणताही विचार न करता घेतलेली कोणतीही शपथ कुराणास मान्य नाही. अल्ला केवळ शब्दांकडे पाहत नाही, तर त्यामागील भाव आणि हेतू लक्षात घेतो, असेच कुराण सांगते. पती आणि पत्नीमधील संबंध दुरावलेले असल्यास त्यांच्यात समेट होण्यासाठी टार महिन्यांचा कालावधी दिला जावा. त्या काळात त्यांच्यातील मतभेद न मिटल्यास पत्नीला पतीबरोबर राहण्यास भाग पाडले जाऊ नये, असेच कुराणातही म्हटले आहे. अशा वेळी विभक्त होणे हाच योग्य पर्याय असल्याचे कुराणाने नमूद केले आहे.

शुरा (दोन) मधील कलम २९ मधील २२९ ते २३१, कलम ३० मधील २३२ व २३३ आणि कलम ३१ मधील २३७ या आयतही तलाकबाबत पुरेसा प्रकाश टाकतात. पतीने रागाच्या भरात, अचानकपणेच वैवाहिक संबंध संपुष्टात आणू नयेत, असे २३० क्रमांकाच्या आयतमध्ये नमूद केले आहे. तलाकनंतरही पुन्हा विवाहास कुराणाने परवानगी दिली आहे. मात्र, असा विवाह समानतेच्या तत्त्वावर आधारलेला असला पाहिजे. पती आणि पत्नीने परस्परांचा मानसन्मान ठेवला पाहिजे. पतीने समानतेच्या त्वार पत्नीचा पुन्हा स्वीकार करावा किंवा तिला सन्मानाने विभक्त होऊ द्यावे, असाच कुराणाचा संदेश आहे. कुराणातील वरील सर्व आयतांचा विचार करता तलाक ए बिद्दतचा कुराणात कुठेच निर्देश नाही. त्यामुळेच तलाक ए बिद्दत (तीनदा तलाक) हा मुस्लिम पर्सनल लॉचा (शरियत) भाग मानता येणार नाही.

मुस्लिम पर्सनल लॉबाबत भारतातील विधेयके (भाग ४)

मुस्लिम धर्माचे पालन करणाऱ्या सर्व व्यक्तींचे सर्व व्यवहार पूर्वापार रूढी, परंपरांवर आधारलेल्या कायद्यांनी बद्ध होते. हे रूढीवादी कायदे मुस्लिम महिलांची मुस्कटदाबी करणारे आणि त्यांच्या हक्कांवर गदा आणणारे आहेत, अशी टीका स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम महिला संघटना करत होत्या. तसेच, मुस्लिम पर्सनल लॉ मुस्लिम महिलांनाही लागू केला जावा, अशी मागणी या

संघटना करत होत्या. त्यातूनच मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट १९३७ संमत केला गेला. या कायद्याच्या उद्दिष्टांमध्येच याची कारणमीमांसाही देण्यात आली आहे.

परंपरावादी कायदे रद्द करून पर्सनल लॉ लागू केला जावा, अशी ब्रिटिश राजवटीतील मुस्लिमांची गेल्या अनेक वर्षांची मागणी आहे. वृत्तपत्रे आणि अन्य व्यासपीठांवरही हा मुद्दा प्राधान्याने उपस्थित केला जात आहे. त्याचीच दखल घेत जमियत उलेमा ए हिंद या सर्वोच्च संस्थेने या मागणीला पाठिंबा देत नवा कायदा लागू करण्यासाठी सर्व संबंधितांना आवाहन केले. प्रचलित रूढीवादी कायद्यांना कोणताही भक्कम आधार नाही आणि त्यात वारंवार बदल करण्याची गरजही भासते. भविष्याचा विचार करता असा कायदा कुचकाणी ठरेल. प्रचलीत रुढीवादी कायद्यात महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले असून, महिलांचे हक्कही डावलेले गेले असल्याने मुस्लिम पर्सनल लॉची मागणी मुस्लिम महिला करत आहेत. हा कायदा लागू केला गेल्यास मुस्लिम महिलांनाही समान हक्क व समान स्थान मिळू शकेल. तसेच, महिला व पुरुषांच्या हक्कांबाबतची स्पष्ट जाणीव समाजाला होईल.

याच कायद्यातील कलम २, ३ व ५ हे या खटल्याबाबत अधिक महत्त्वपूर्ण आहेत. त्यांचा गोषवारा थोडक्यात असा आहे.

परस्पर संमतीने विभक्त होणे, वडिलोपार्जित किंवा करार, बक्षीस किंवा पर्सनल लॉच्या तरतुदींनुसार अन्य कारणांमुळे महिलांकडे असलेली व्यक्तिगत संपत्ती, निकाह, तलाक, त्यानंतरची देखभाल, पालकत्व, ट्रस्ट किंवा ट्रस्टच्या (चॅरिटेबल इन्स्टिट्युशन्स, धार्मिक संस्था वगळून) मालमत्तांबाबतचा निर्णय मुस्लिम पर्सनल लॉनुसार (शरियत) केला जाईल. एखाद्या मुस्लिम महिलेने पतीपासून विभक्त होण्यासाठी दाखल केलेल्या अर्जावर मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) कायद्यानुसार जिल्हा न्यायाधीश निकाल देऊ शकतात, असे या कलमांचे स्वरूप आहे. या कायद्यातील कलम ५ पुढे वगळण्यात आले आणि बरीच भवती न भवती होऊन डिझोल्युशन ऑफ मुस्लिम मॅरेज ॲक्ट हे कलम १९३९मध्ये शरियत कायद्यात समाविष्ट केले गेले. मुस्लिम महिला कोणकोणत्या कारणांसाठी पतीपासून विभक्त होऊ शकतात, याच्या तरतुदी या कलमात दिल्या गेल्या आहेत. तथापि, या खटल्यात मुस्लिम महिलेने नव्हे, तर पतीने विभक्त होण्यासाठी तलाक दिला असल्याने या खटल्यात हे कलमही लागू होत नाही.

मुस्लिम व बिगर मुस्लिम देशांनी तलाक ए बिद्दतवर घातलेली बंदी (भाग ५)

जगभरातील मुस्लिम व बिगर मुस्लिम देशांनी तलाक ए बिद्दतवर कशाप्रकारे कायदेशीर बंदी घातली आहे, याचे विवेचन ताहीर महंमद यांनी 'मुस्लिम लॉ इन इंडिया अँड अब्रॉड' या पुस्तकात केले आहे. याबाबत अरब देश, आग्नेय आशियायी देश व उपखंडातील देशांनी कोणते कायदेशीर मार्ग हाताळले आहेत, याचाही माहिती या पुस्तकात देण्यात आली आहे. अल्जीरिया हा सुन्नीबहुल देश आहे. तेथे न्यायालयामार्फतच तलाक घेण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. इजिप्त हाही सुन्नीबहुल अरब देश असून, तेथेही तोंडी तलाकवर कायद्याने बंदी घालण्यात आली आहे. इराक हा शियाबहुल देश आहे. तेथेही तोंडी तलाकला बंदी कायद्याने बंदी घालण्यात आली

आहे. पतीने न्यायालयात जाऊनच तलाकची मागणी केली पाहिजे. इद्दतच्या मुदतीत असा अर्ज दाखल करणे बंधनकारक आहे. तसेच, पतीचे निकाहचे प्रमाणपत्र जोपर्यंत न्यायालय रद्दबातल ठरवत नाही, तोपर्यंत ते वैधच मानले जाईल, असे इराकी कायद्यांत नमूद केले आहे. लीबिया, जॉर्डन, कुवेत, लेबनॉन, मोरोक्को, सुदान, ट्युनिशिया, संयुक्त अरब अमिराती या अरब देशांनीही तोंडी तलाकला कायदेशीर बंधन घातले आहे. केवळ न्यायालयामार्फतच तलाक घेण्याचे बंधन तेथील नागरिकांवर घालण्यात आले आहे. साहजिकच तलाक ए बिद्दतवर त्या देशांत कायदेशीर बंदी घालण्यात आली आहे.

इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपिन्स या आग्नेय आशियायी देशांतही न्यायालयामार्फतच तलाक घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तलाकची कारवाई पूर्ण होण्यापूर्वी एकदा पती पत्नीत समेटाचा प्रयत्न केला जावा. मात्र, त्यानंतरही दोघांतील मतभेद मिटत नसल्याचे सिद्ध होत असल्याच तलाक दिला जावा. ही सर्व कारवाई न्यायालयाच्या देखरेखीखाली पार पाडली जावी, असे तेथील कायद्यांत नमूद करण्यात आले आहे. पाकिस्तान, बांगला देश व श्रीलंका या उपखंडातील देशांतही न्यायालयांमार्फतच तलाक बंधनकारक करण्यात आला आहे.

वादी व अन्य पक्षकारांचे प्रतिपादन (भाग ६)

या खटल्यात वादीने स्वत: आपले म्हणणे मांडले आहेच; शिवाय ज्येष्ठ वकील अमितसिंग चड्ढा यांनीही म्हणणे मांडले आहे. मुस्लिम पर्सनल लॉच्या इतिहासाकडे त्यांनीच न्यायालयाचे लक्ष वेधले आहे. तलाक ए बिद्दत म्हणजे तोंडी तीनदा तलाक देण्याचा पुरुषाला असलेला अधिकार हा एकतर्फी आणि महिलांवर अन्याय करणारा आहे. कोणतेही कारण न देताही आणि पत्नीच्या अनुपस्थितीतही पतीने तोंडी तीनदा तलाक दिला, तरी त्याचे पालन करणे पत्नीला बंधनकारक राहते. कोणत्याच कारणाशिवाय आणि पत्नीच्या अनुपस्थितीतही असा तलाक देणे हे घटनेच्या कलम १४ मधील समानतेच्या तत्वाविरुद्ध आहे. घटनेने दिलेल्या मुलभूत हक्कांची त्यातून पायमल्ली होते. कायद्यापुढे सर्व समान आहेत आणि कायदे सर्वांना समान आहेत, असे कलम १४ सांगते. तथापि, तलाक ए बिद्दतमुळे मुस्लिम महिलांचा हा समानतेचा हक्क हिरावला जातो. घटनेच्या कलम १५ मध्ये लिंगभेदही नाकारला गेला आहे. स्त्री व पुरुष समानतेचे तत्त्व या कलमात अंतर्भूत आहे. तीनदा तलाकमुळे मुस्लिम महिलांबाबत या हक्कांचीही पायमल्ली होते, असे म्हणणे ॲड. चड्ढा यांनी मांडले. एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली होत असल्यास, त्या प्रकरणात हस्तक्षेप करून न्यायालयाने संबंधित व्यक्तीस न्याय दिला पाहिजे, असा निकाल केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य सरकार आणि मिनर्व्हा मिल्स विरुद्ध केंद्र सरकार या खटल्यात न्यायालयाने पूर्वी दिला आहे त्याकडेही ॲड. चड्ढा यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. घटनेच्या २१व्या कलमाने दिलेल्या मूलभूत हक्कांपासूनही विवाहित मुस्लिम महिला वंचित राहतात. त्यामुळेच न्यायालयाने या महिलांना न्याय मिळवून दिला पाहिजे, असेही अँड. चड्ढा यांनी न्यायालयास सांगितले.

तलाक ए बिद्दतला इस्लाममध्येही पूर्णपणे मान्यता नाही, हे यापूर्वीच्या काही खटल्यांतील निकालांवरून दिसून आले आहे. त्यामुळे विवाहित मुस्लिम महिलांना सन्मानाने जगण्यासाठी,

त्यांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली रोखण्यासाठी न्यायालयास हस्तक्षेप करण्याची मूभा असून, न्यायालयाने या महिलांच्या मूलभूत हक्कांचे रक्षम करावे व त्यांना न्याय मिळवून द्यावा, असेही अँड. चड्ढा यांनी न्यायालयास सांगितले.

जगातील अनेक मुस्लिम देशांनीही तलाक ए बिद्दत म्हणजे तोंडी तीनदा तलाकवर कायद्याने बंदी घातली आहे. समजा एखाद्या पतीने तोंडी तीनदा तलाक म्हटले, तरी तो एकदाच म्हटला गेला असे समजावे, अशी तरतूदही या मुस्लिम देशांतील कायद्यांत केली गेली आहे. इस्लाममधील अनेक पंथांचीही तलाक ए बिद्दतला मान्यता नाही. अशा स्वरूपाचा तलाक हे पापकर्मच असल्याचेही हे पंथ मानतात. तसेच, अशा तलाकमुळे मुस्लिम महिलांच्या मूलभूत हक्कांवर गदा येते. घटनेने सर्व नागरिकांना कलम १४, १५ व २१ या कलमांन्वये दिलेल्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याची, हे हक्क अमलात यावेत याकडे लक्ष देण्याची जबाबदारी घटनेच्या कलम ३२ नुसार न्यायसंस्थेवर आहे. हिंदू धर्मातील सती व देवदासींसारख्या प्रथांवर कायद्यांद्वारेच बंदी घालण्यात आली असून, या कायद्यांचे काटेकोर पालन होते किंवा नाही, यावर न्यायसंस्था लक्ष ठेवते. तसेच, तलाक ए बिद्दतसारखी, मुस्लिम महिलांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारी प्रथाही रद्द करण्याबाबत न्यायालयाने सकारात्मक भूमिका घ्यायला हवी. तसे झाल्यासच मुस्लिम महिलांचे मूलभूत हक्क सुरक्षित राहू शकतील, असे म्हणणे ॲड. चड्ढा यांनी मांडले.

या खटल्यातील अन्य वरिष्ठ वकील आनंद ग्रोव्हर यांनीही मुस्लिम धर्मातील तलाकच्या पद्धतींचे विवेचन न्यायालयापुढे केले. तलाक ए एहसान व तलाक ए हसन या दोन पद्धतींना कुराण व हदिथची मान्यता आहे. तलाक ए बिद्दतला कुराण किंवा हदिथची मान्यता नाही. सुन्नींमधील हनाफीसारख्या काही पंथांतच याला मान्यता आहे. याला मान्यता देणारे पंथही हे पापकर्म असल्याचेच मानतात. तत्त्वतः हे चूक असले, तरी अमलात आणण्यास योग्य (बॅड इन थिऑलॉजी, गूड इन लॉ), असे हे पंथ मानतात. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनीही या प्रथेस

मान्यता दिली होती. त्यामुळेच देशात अशा प्रकारे तलाक दिला जाण्याचे प्रकार वाढले, याकडे ॲड ग्रोव्हर यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. तसेच, स्वतंत्र भारतात ज्या ज्या वेळी तलाक ए बिद्दतबाबतचे खटले उच्च न्यायालयांपुढे आले, त्या प्रत्येक वेळी संबंधित उच्च न्यायालयांनी तलाक ए बिद्दतला कुराण व हदिथची मान्यता नसल्याचेच दाखवून दिले आहे. आपल्या पत्नीस मनमानी पद्धतीने तलाक देण्याचा मुस्लिम पतीस कोणताही अधिकार नाही, हेच या सर्वांतून स्पष्ट होत आहे. तलाक ए बिद्दत एकतर्फी व मनमानी असून, त्यामुळे मुस्लिम महिलांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करणारा आहे. त्यामुळेच तो कायदेशीरदृष्ट्या अवैध ठरवला जावा, असे म्हणणे अँड ग्रोव्हर यांनी न्यायालयापुढे मांडले.

सेंटर फॉर स्टडी ऑफ सोसायटी अँड सेक्युलॅरिझम संस्थेच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंह यांनीही या खटल्यात आपले म्हणणे मांडले. भारत हा बहुसांस्कृतिक देश आहे. देशातील प्रत्येक धर्मियांना आपापल्या श्रद्धा जोपासण्याचा अधिकार घटनेच्या २५व्या कलमाने दिला आहे. तसेच, काही विशिष्ट बाबतींत प्रत्येक धर्मीयांना आपापले प्रश्न सोडवण्यासाठी काही विशिष्ट कायदेही करण्यात आले आहेत. तथापि, घटनेत नमूद केलेल्या मूलभूत हक्क व अधिकारांवर त्यामुळे अतिक्रमणहोत नाही ना, हेही पाहणे गरजेचे आहे. तलाक ए बिद्दतमुळे मुस्लिम महिलांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली होत असून, लिंगभेदासही त्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे लिंगभेदविरहित समानतेचा त्यांचा अधिकारही हिरावला जातो आहे. आपल्या घटनेतील मूलभूत हक्कांच्या तरतुदी आणि संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांची केलेली सनद या दोन्हींचा विचार करता तलाक ए बिद्दत अवैध ठरते. देशातील मुस्लिमवगळता अन्य धर्मांमध्ये घटस्फोट ही केवळ व्यक्तिगत किंवा कौटुंबिक बाब ठरत नाही. न्यायसंस्थेमार्फतच असे संबंध संपुष्टात आणण्यावर शिक्कामोर्तब केले जाते. ही बाब लक्षात घेता एकतर्फी दिला जाणारा तलाक ए बिद्दत हा पब्लिक पॉलिसीविरुद्ध असल्याने घटनाबाह्य व अवैध ठरवला जावा, असे म्हणणे इंदिरा जयसिंह यांनी मांडले.

सलमान खुर्शिद यांनीही या खटल्यात आपले म्हणणे मांडले. इस्लामिक कायद्यांबाबत जेव्हा एखादी समस्या उद्भवते तेव्हा त्यातून मार्ग काढण्यासाठी सर्वप्रथम कुराणचा आधार घेतला जातो. कुराणात याबाबत स्पष्ट मार्गदर्शन नसल्यास हदिथमध्ये काय नमूद करण्यात आले आहे, हे पाहिले जाते. हदिथमध्येही असे मार्गदर्शन मिळत नसल्यास त्याबाबत सर्वसाधारणपणे लोकमानस, ज्याला इज्मा म्हणतात, काय आहे, हे पाहिले जाते. तलाक ए बिद्दतबाबतही असे मार्गदर्शन कुराणात आणि हदिथमध्ये मिळते. एकाच वेळी तीनदा तलाकचा उच्चार करून तलाक देणे कुराणासही मंजूर नाही. असा तीनदा तलाकचा उच्चार केला, तरी तो एकच मानावा, असे कुराणात कसे नमूद केले आहे, हे खुर्शिद यांनी मांडले. कुराण व हदिथमधील मार्गदर्शनाचा विचार करता वादींना आणि त्यांच्यासारख्या समस्यांचा सामना करणाऱ्यांना न्यायालयाने न्याय दिला पाहिजे. तलाक ए बिद्दतला मुस्लिम व गैरमुस्लिम देशांतही बंदी आहे. एकाच वेळी तीनदा म्हटला गेलेला तलाक हा एकच असल्याची स्पष्ट तरतूद विविध देशांनी केली आहे. तशीच तरतूद असणारा कायदा आपल्या देशातही व्हावा आणि त्यासाठी न्यायालयाने सरकारला निर्देश द्यावेत. तोंडी तीनदा तलाक दिल्यानंतरही तो एकदाच व पहिलाच तलाक ठरवून तलाक ए एहसान किंवा तलाक ए हसन या प्रकारांसारखाच तो मानला जावा आणि पतीस या तलाकनुसारच पुढील कारवाई करणे

बंधनकारक केले जावे, असेही म्हणणे खुर्शिद यांनी मांडले.

डॉ. नूरजहाँ साफिया नियाझ यांच्या खटल्यात काम पाहणाऱ्या ॲड. नित्या रामकृष्ण यांनीही न्यायालयात या विषयावर आपली बाजू मांडली. कुराण आणि हदिथमध्ये तलाक ए बिद्दतला मान्यता नाही. तसेच, इस्लामच्या उदयापासूनच इस्लामने महिलांनाही समान अधिकार बहाल केले आहेत. महिलांनाही तलाक आणि पुनर्विवाहाचा अधिकार इस्लामने दिला आहे. महिलांना असे समान अधिकारे देणाऱ्या इस्लामने म्हणूनच तलाक ए बिद्दतला मान्यता दिलेला नाही. ब्रिटिशांनीही इस्लामच्या या तत्त्वांना मान्यता देत मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲक्ट १९३७ मंजूर केला होता. त्यातही महिलांना तलाकचा व पुरर्विवाहाचा अधिकार दिला गेला आहे. शिया किंवा अन्य पंथांतही तलाक ए बिद्दतला मान्यता नाही. मुस्लिम महिलांचे हक्क डावलणाऱ्या या प्रकारास अवैध व घटनाबाह्य ठरवले जावे, असे ॲड. नित्या यांनी न्यायालयास सांगितले.

मुस्लिम वुमेन पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने डॉ. राजन चंद्रा आणि आरिफ मोहंमद खान यांनी बाजू मांडली. तलाक ए बिद्दतमुळे मुस्लिम महिलांची अवहेलना होत असून, त्यांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली होते. तसेच, लिंगभेद समानतेच्या तत्वालाही त्यामुळे हरताळ फासला जातो आणि मुस्लिम महिलांना या भेदभावास सामोरे जावे लागते, हे या खटल्याशी संबंधित सर्वच घटकांना मान्य आहे. त्यामुळे मुस्लिम महिलांना न्याय देण्यासाठी न्यायालयानेच पुढाकार घेतला पाहिजे. मुस्लिम महिलांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणारा, त्यांना समानतेची हमी देणारा कायदा करण्याचे निर्देश सरकार व संसदेला दिले जावेत. सरकार किंवा संसदेने असा कायदा न केल्यास न्यायालयाने पुढाकार घेऊन याबाबत पावले टाकावीत. ब्रिटिश राजवटीत तत्कालीन ब्रिटिश सरकारने राजकीय व सामाजिक विरोध डावलून मुस्लिम महिलांना काही कायदेशीर अधिकार मिळवून दिले. स्वातंत्र्यानंतर या आघाडीवर शांतता पसरली आहे. त्यामुळे मुस्लिम महिला आजही अधिकारांपासून वंचित आहेत, असे या वकिलांनी न्यायालयास सांगितले. तसेच, तलाक ए बिद्दत घटनाबाह्य व अवैध ठरवला जावा, अशी विनंतीही त्यांनी न्यायालयास केली.

ॲटर्नी जनरल मुकुल रोहतगी यांनी या खटल्यात सरकारची बाजू मांडली. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारणाऱ्या, अंगिकारणाऱ्या लोकशाही देशात केवळ धर्माच्या आधारे मुस्लिम महिलांना वेगळी वागणूक देणे योग्य ठरणार आहे का, मुस्लिम महिलांना आत्मसन्मान, समानतेची वागणूक केवळ धर्माच्या आधारे नाकारली जाणार का, हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. मुस्लिम महिलांना सन्मानाने जगण्याचा, समाजात आत्मसन्मानाने वावरण्याचा अधिकार घटनेच्या १४, १५, २१ व ५१व्या कलमांनी दिला आहे. घटनेच्या या कलमांबाबत कोणत्याही स्थितीत व कोणत्याही कारणांस्तव कोणतीही तडजोड केली जाऊ शकत नाही. तलाक ए बिद्दतसारख्या प्रकारांमुळे मुस्लिम महिलांच्या मूलभूत हक्कांवरच गदा येते असे नव्हे, तर घटनेच्या या तरतुदींनाही हरताळ फासल्यासारखे आहे. जगातील मुस्लिम देशांनीही इस्लामच्या तत्त्वांचे पालन करतानाच तलाक ए बिद्दतवर बंदी घालत सुधारणेचा मार्ग स्वीकारला आहे. मात्र, आपल्या देशात अशी सुधारणा अद्याप झालेली नाही. त्यामुळे मुस्लिम देशांतील महिलांपेक्षाही धर्मनिरपेक्ष भारतातील मुस्लिम महिलांची अवस्था अशा घटनांत अधिक दयनीय बनते, याकडेही ॲटर्नी जनरलनी न्यायालयाचे लक्ष वेधले. देशात फक्त राजकीयच नव्हे, तर सामाजिक लोकशाही रुजली पाहिजे, असे डॉ. आंबेडकर

म्हणत. या सामाजिक लोकशाहीची तत्त्वेही समानता, आत्मसन्मान आणि परस्पर साहचर्यावरच अवलंबून आहेत. केवळ धर्माच्या नावाखाली मुस्लिम महिलांना त्यापासून वंचित ठेवणे आणि त्यांना भेदभावाची वागणूक देणे योग्य नाही आणि असे वर्तन हे घटनाविरोधीही आहे. त्यामुळे तलाक ए बिद्दत घटनाविरोधी व अवैध आहे, हेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

प्रतिवादींचे प्रतिपादन (भाग ७)

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या (एआयएमपीएलबी) वतीने कपिल सिब्बल व अन्य मान्यवर वकिलांनी आपली बाजू न्यायालयापुढे मांडली. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात धर्म ही फार महत्त्वाची बाब असते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे सर्व संस्कार याच धर्माच्या अनुषंगाने पार पाडले जातात. विवाह आणि घटस्फोट या गोष्टीही त्यास अपवाद नाहीत. त्यामुळे धर्माची तत्त्वे, त्याबाबतच्या मान्यतांनाही सामाजिक जीवनात महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळेच घटनेने प्रत्येक व्यक्तीला धर्मपालनाचे स्वातंत्र्य दिले आहे आणि ते कोणीही कोणत्याही स्थितीत व कोणत्याही कारणांस्तव हिरावून घेऊ शकत नाही. घटनेच्या १४, १५, व २१ वे कलम पुढे करून या स्वातंत्र्यास आणि पर्यायाने पर्सनल लॉला आव्हान देता येणार नाही, असे सिब्बल यांनी न्यायालयास सांगितले.

भारतात शिया व सुन्नी अशा दोन्ही पंथांचे नागरिक राहतात. त्यातही सुन्नीपंथीय बहुसंख्य आहेत. त्यांच्यातही चार उपपंथ असून, त्यातील हनाफीपथीय बहुसंख्येने आहेत, असे निदर्शनास आणून देऊन सिब्बल म्हणतात, की इस्लामच्या सर्वच पंथांना तलाक मान्य नसला, तरी त्यांनी यास मान्यता दिली आहे. तसेच, तलाकची नेमकी कार्यपद्धती काय यावरही कुराण किंवा हदीथमध्ये मार्गदर्शन मिळत नाही. असे असताना वादींनी कुराणाचा हवाला देऊन तलाकबाबत केलेली मांडणी गैर आहे. महंमद पैगंबरांनी वेळोवेळी केलेल मार्गदर्शन, त्यांनी केलेल्या आज्ञांचे पालन मुस्लिम समाज गेली अनेक शतके श्रद्धेने करत आला आहे. त्यातूनच मुस्लिम समाजाची म्हणून एक विचारसरणी, जीवनपद्धती विकसित होत गेली असून, त्याचेच प्रतिबिंब पर्सलन लॉमध्ये (शरियत) उमटलेले आहे. तलाक हाही त्यातलाच एख भाग असून, तो कसा द्यावा किंवा त्याबाबतची कार्यपद्धती नेमकी काय आहे, याचे नेमके आकलन त्याच समुदायास आहे. त्यामुळे याबाबतचा निर्णयही त्याच समुदायास घेऊ द्यावा. त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करू नये. या खटल्यात वादींच्या वकिलांनी आपल्या म्हणण्याच्या पुष्टर्थ्य अनेक विद्वानांनी काय म्हटले आहे, ते मांडले आहे. मात्र, त्यातही विसंगती दिसते. प्रत्येक विद्वानाने आपापल्या विचारसरणीनुसार व मकदुरानुसार अर्थ लावला आहे. तसेच, हे विद्वान सुन्नीपंथीय नसल्यानेही त्यांचे हे प्रतिपादन अप्रस्तुत ठरते. तलाक ए एहसान, तलाक ए हसन व तलाक ए बिद्दत हे तलाकचे तीन प्रकार कुराण किंवा हदिथमध्ये कुठेच नमूद नाहीत. तरीही मुस्लिम समुदायात शतकानुशतके ही प्रथा राहिली आहे. तलाकच्या या तीन प्रकारांत निकाह संपुष्टात येतोच. फक्त त्याच्या कालवधीत फरक पडतो, याकडेही सिब्बल यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. या खटल्यातील वादीने निकाह तत्काळ संपुष्टात आणण्यास आक्षेप घेतला आहे, तलाकला नव्हे, याकडेही त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. सुन्नीपंथातील हनाफी उपपंथात शतकानुशतके तलाक ए बिदातची प्रथा चालू राहिली असून, हा

हानाफी पंथीयांच्या जीवनपद्धतीचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे त्यास अवैध ठरवता येणार नाही, असे आग्रही प्रतिपादन सिब्बल यांनी न्यायालयापुढे केले.

गुंतागुंतीचे प्रश्न आणि न्यायालयाचे निष्कर्ष (भाग ८)

या खटल्यात काही गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यांचा परामर्ष घेणे आवश्यक आहे. तलाक ए बिद्दतला कायदेशीर मान्यता नाही, असे वादींचे म्हणणे आहे, तर तलाक ए बिद्दत हा पर्सनल लॉ असल्याने त्याला घटनात्मक संरक्षण असल्याची भूमिका प्रतिवादींनी मांडली आहे. त्यामुळेच तलाक ए बिद्दतच्या वैधतेचा प्रश्न प्राधान्याने हाताळावा लागणार आहे. तलाक ए बिद्दतमुळे घटनेने बाहल केलेल्या मूलभूत हक्कांची पायमल्ली होते का, तसेच या प्रश्नात न्यायालयाला हस्तक्षेप करता येतो का, या प्रश्नांचाही विचार या निमित्ताने करावा लागणार आहे.

या खटल्यात वादी व प्रतिवादींनी रशीद अहमद खटल्यात तत्कालीन प्रिव्ही कौन्सिलने दिलेल्या निकालाचा दाखला दिला आहे. या निकालाने तलाक ए बिद्दतला मान्यता दिली आहे. मात्र, वादींनी यालाही आक्षेप घेतला आहे. तलाक ए बिद्दतसंदर्भात यापूर्वी उच्च न्यायालयांनी वेळोवेळी मांडलेले निष्कर्ष आणि घटनेने बहाल केलेल्या मूलभूत हक्कांच्या पार्श्वभूमीवर या निकालाचाही फेरविचार करण्याची मागणी वादींनी केली आहे. रशीद अहमद खटल्यात प्रिव्ही कौन्सिलने पर्सनल लॉचा चुकीचा अर्थ लावल्याचा निष्कर्ष विविध उच्च न्यायालयांनी पूर्वी काढला आहे. केरळ उच्च न्यायालयाने (न्या. कृष्णन अय्यर) तर प्रिव्ही कौन्सिलचा निकाल कसा चुकीचा होता, याचे विस्तृत विवेचन केले आहे. ही पार्श्वभूमी लक्षात घेता वादींची मागणी योग्य ठरते आणि त्यामुळेच रशीद अहमद खटल्यातील निकालाचे फेरपरीक्षण करणे गरजेचे आहे आणि त्यामुळेच या प्रश्नात हस्तक्षेपाचा अधिकार न्यायालयाला आहे.

गुवाहाटी उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश बहरूल इस्लाम यांनी जियाउद्दीन अहमद खटल्यात प्रिव्ही कौन्सिलचा निर्णय कसा चुकीचा होता, हे दाखवून दिले होते. त्यांच्या या निर्णयाचा गुवाहाटी खंडपीठाने फेरविचार करतानाही न्या. बहरूल इस्लाम यांनी काढलेले निष्कर्षच योग्य असल्याचा निर्णय दिला. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. बदरदुरेझ अहमद यांनीही मसरूर अहमद खटल्यात वरीलप्रमाणेच निकाल दिला होता. तलाक ए बिद्दतसंदर्भात प्रिव्ही कौन्सिलने (रशीद अहमद खटल्यात) दिलेला निकाल मुस्लिम पर्सनल लॉला अनुसरून नाही, असेच या सर्व न्यायाधीशांनी त्यांच्या निकालांत स्पष्ट केले आहे. केरळ उच्च न्यायालयाचे न्या. मुहंमद मुश्ताक यांनी नझीर खटल्यात निकाल देताना, तलाक ए बिद्दतमुळे मुस्लिम महिलांना कोणत्या हालांस सामोरे जावे लागते, याचे दारूण चित्रच मांडले आहे. वरील सर्व निर्णय लक्षात घेता आणि घटनेतील मूलभूत अधिकार लक्षात घेता तलाक ए बिद्दतबाबत प्रिव्ही कौन्सिलने दिलेल्या निकालाचे फेरपरीक्षण करणे गरजेचे ठरते.

तलाक ए बिद्दतला कुराणात कुठेही आधार नाही, असे म्हणणेही वादींनी मांडले आहे. तलाक ए बिद्दत बरोबरच तलाक ए एहसान व तलाक ए हसनलाही कुराणात आधार सापडत नाही. मात्र, या दोन प्रकारांना कोणीच फारसा आक्षेप घेतलेला नाही. तलाक ए बिद्दत या प्रकारावरच

सर्वांचा आक्षेप दिसतो आहे. केवळ कुराणात आदार सापडत नाही म्हणून या एकाच प्रकाराला अवैध ठरवता येईल का, याबाबातही विचार करावा लागेल. मात्र, वादींनी असा आक्षेप घेताना अन्यही काही मुद्दे उपस्थित केले आहेत. तलाक ए बिद्दत हा अयोग्य किंवा गैर प्रकार आहे, असे सुस्लिम समाजात मानले जाते. किंबहुना ते पापकर्मही ठरवले जाते. वैचारिकदृष्ट्याही जे गैर आहे, त्याला कायदेशीर वैधता देता येऊ शकते का, असा प्रश्नच यानिमित्ताने वादींनी उपस्थित केला आहे. तलाक ए बिद्दत हा पितृसत्ताक पद्धतीचा निदर्शक प्रकार आहे. लिंगसमानतेच्या आजच्या काळात हा प्रकार लिंगसमानतेच्या तत्त्वाला बाधा आणणारा आहे. तसेच, हिंदू धर्मातील सती, देवदासीसारख्या प्रथा बंद करण्यासाठी न्यायालयांनी ज्या प्रकारे पुढाकार घेतला, तसाच पुढाकार या प्रकरणातही घ्यावा, अशी मागणीही वादींनी केली आहे.

एखाद्या धर्मात एखादी गोष्ट पापकर्म (सिनफुल ॲक्ट) मानली जात असेल, तर ती कायदेशीरदृष्ट्या वैध ठरवता येणार नाही. एखादे पापकर्म ही धार्मिक बाब असू शकत नाही आणि अशी बाब अनेक वर्षे सुरू असल्याने तिला मान्यता द्यावी, ही मागणीही योग्य ठरू शकत नाही. दीर्घकाळ चालत आलेली अशी बाब रूढी किंवा परंपरा मानली जाते. ज्याचा उल्लेख पापकर्म म्हणून केला जातो, अशी रूढी किंवा परंपरा कायदेशीरदृष्ट्या अवैध ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना आहे. देवाच्या नजरेत एखादी कृती ही पाप ठरत असेल, तर मानवाने बनवलेला एखादा कायदा ती कृती वैध ठरवू शकतो का, असा प्रश्न या खटल्यातील एका वकिलांनी उपस्थित केला होता. या वकिलांचा हा प्रश्नही या खटल्याबाबत फार महत्त्वाचा आणि बरेच काही सांगून जाणारा आहे. तलाक ए बिद्दत हा प्रकार आधुनिक काळाशी सुसंगत नसल्यानेही तो अवैध ठरवला जाणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन या खटल्यातील अनेक वकिलांनी केले आहे.

या खटल्यात हदिथचाही दाखला वारंवार दिला गेला आहे. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डानेही हदिथचा हवाला वारंवार दिला आहे. तथापि, हदिथची एकच एक असी प्रमाणित प्रत कुठेही उपलब्ध नाही. हदिथची अनेक व्हर्सन्स असून, त्यातील कोणते प्रमाणित मानायचे, यावरही वाद आहेत. त्यामुळे केवळ हदिथचा हवाला पुरेसा ठरणारा नाही. पहिले खलिफा अबु बकर व दुसरे खलिफा उमर यांच्या काळात तलाकचा तीनदा उच्चार केला, तरी तो एकदाच केल्याचे मानले जात होते, हेही या खटल्यातील वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. सुन्नींमधील हनाफी पंथीयांत तलाक ए बिद्दतची प्रथा प्रामुख्याने आढळते. त्यामुळे त्यांच्या मान्यतांचा विचार प्रामुख्याने केला जावा. तसेच, सुन्नी व त्यातही हनाफी पंथीयांशिवायची तलाक ए बिद्दतबाबतची मते अग्राह्य ठरवली जावी, असे म्हणणे मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने मांडले गेले. तथापि, याच पंथातील अनेक विचारवंतांनी या प्रकाराची निंदा केली असून, अशा प्रकारे तलाक देणे पापकर्म असल्याचे म्हटले आहे, हेही वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे. इजिप्त हा सुन्नीबहुल व त्यातही पनाफी पंथीयांची बहुसंख्या असलेला देश आहे. तेथील हदीथमध्येही तलाक ए बिद्दत हे पापकर्म असल्याचे म्हटले आहे, याकडेही वकिलांनी लक्ष वेधले आहे. या सर्व बाबींचा विचार करता मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाची भूमिका ग्राह्य मानता येणार नाही.

तलाक ए बिद्दतची प्रथा सुमारे चौदाशे वर्षांपूर्वी सुरू झाल्याचे इतिहासाचा धांडोळा घेता दिसून येते. अरब देश, आग्नेय आशियायी देश व उपखंडातील देशांनी या प्रकाराला कायदेशीर

बंदी घातली आहे. त्याकडेही या खटल्यातील वकिलांनी न्यायालयाचे लक्ष वेधले आहे. त्यातून एक बाब स्पष्ट होते, की फक्त भारतातच नव्हे, तर जगभरात तला ए बिद्दतची प्रथा होती आणि तिचे पालनही केले जात होते. अन्यथा मुस्लिम देशांना कायद्याने या प्रथेवर बंदी घालण्याचे अन्य कोणतेही कारण नव्हते. मुस्लिमांमधीलही शियापंथीयांत यास मान्यता नाही. सुन्नीपंथीयांतही हनाफी पंथीयांतच प्रामुख्याने ही प्रथा दिसून येते. प्रिव्ही कौन्सिलसमोर आलेला खटला असो, की अन्य मुस्लिम देशांनी केलेले कायदे असोत, त्यातून एक गोष्ट स्पष्ट होते. की मुस्लिमांमध्ये (व त्यातही हनाफी पंथीयांमध्ये) ही प्रथा असून, तो त्यांच्या धार्मिक श्रद्धेचाच भाग आहे. त्यामुळे तलाक ए बिद्दतही पर्सनल लॉचाच भाग मानावा लागेल.

पर्सनल लॉला घटनात्मक वैधता आहे. असे असतानाही तलाक ए बिद्दत घटनाबाह्य व अवैध ठरवता येऊ शकतो का, हा प्रश्नही न्यायालयापुढे उपस्थित झाला. घटनेच्या २५ व्या कलमात नमूद केलेल्या तरतुदींनुसार पर्सनल लॉ असेल, तर तो वैधच मानला जाईल. मात्र, घटनेच्या तिसऱ्या परिशिष्टातील कलमांना छेद देणाऱ्या तरतुदी संबंधित कायद्यांत असतील, तर संबंधित कायदा अवैध ठरवला जावा, अशी तरतूदही घटनेच्या कलम १३ (१) मध्ये आहे. दोन व्यक्ती किंवा कुटुंबांतील समस्या या पर्सनल लॉच्या अंतर्गत येतात आणि त्याच आधारे त्यांची सोडवणूक केली जाते. त्यात राज्याला हस्तक्षेपाचा अधिकार नसल्याने या कायद्यांना आव्हान देता येणार नसल्याचे प्रतिपादनही प्रतिवादींनी केले. मुस्लिम समाजातील विविध मान्यतांचा विचाक करूनच शरियत कायदा तयार करण्यात आला असल्याने या कायद्यांतर्गत येणारी कोणतीही बाब खासगी स्वरुपाची किंवा केवळ दोन पक्षकारांमधील ठरत नाही, तर त्यात शासन व्यवस्थेचेही महत्त्वाचे स्थान अधोरेखित होते. शरियतचा हेतू तसा नसेल, तर मग हा कायदा संमत करण्यामागे दुसरा कोणता हेतू होता, असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित केला गेला आहे.

मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट १९३७ लागू करण्याच्या वेळी झालेल्या चर्चेकडे कपिल सिब्बल व व्ही. गिरी या वकिलांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. घटनात्मक दर्जाच्या हेतूने हा कायदा तयार करण्यात आलेला नसून, मुस्लिम समाजातील प्रचलित चालीरीती, रूढी, परंपरांचा पगडा कमी करण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे. हा कायदा अस्तित्वात आल्यानंतरही खेड्यापाड्यांतील किंवा दुर्गम भागातील स्थानिक मुस्लिम समाजातील चालीरीतींना एकदमच अटकाव केला जाणार नाही. तसेच, काही प्रसंगी या कायद्यापेक्षाही स्थानिक चालीरीतींनाच प्राधान्य दिले जाईल, असे तत्कालीन वायव्य सरहद्द प्रांतातील सदस्य अब्दुल कय्यूम यांनी म्हटले होते. या चर्चेतील ही बाब लक्षात घेता या कायद्याला कधीच घटनात्मक स्वरुपाचा दर्जा नव्हता, असे म्हणावे लागेल. त्यामुळे घटनेच्या १३ (१) मधील तरतुदीनुसार तलाक ए बिद्दतची वैधता तपासता येणार नाही, असे प्रतिपादनही या वकिलांनी केले.

मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट १९३७ मध्ये मंजूर झाला असला, तरी पर्सनल लॉचा त्याचा दर्जा बदललेला नाही, हे यातून स्पष्ट होते. हा पर्सनल लॉ सुन्नी मुस्लिमांनाही लागू असून, तलाक ए बिद्दत हा या पर्सनल लॉचाच भाग हेही यातून स्पष्ट होते. घटनेच्या २५ व्या कलमातील तरतुदींचे यामुळे उल्लंघन होते का आणि त्यामुळे तो रद्दबातल ठरवता येतो का हे पाहणेही अगत्याचे आहे. तलाक ए बिद्दत हा पर्सनल लॉचाच भाग असून, तो धार्मिक श्रद्धेशी

निगडीत असल्याने रद्दबातल ठरवता येणार नाही, असे आग्रही प्रतिपादन ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या वकिलांसह अन्य प्रतिवादींच्या वकिलांनीही केली. त्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश एम. सी. छागला. व न्या. गजेंद्रगडकर यांनी नरसू आप्पा माळी खटल्यात दिलेल्या निकालाचा संदर्भही या वकिलांनी दिली. याशिवाय देशातील अन्य उच्च न्यायालयांनी याबाबत दिलेल्या निकालांकडेही या वकिलांनी लक्ष वेधले. अँटर्नी जनरलनी या प्रतिपादनास आक्षेप घेतला. तथापि, त्यांचा हा आक्षेप योग्य मानता येणार नाही, हे येथे नमूद करावे लागेल. घटनेच्या २५ व्या कलमाकडेही अॅटर्नी जनरलनी न्यायालयाचे लक्ष वेधले. एखादी कृती किंवा श्रद्धा व्यापक जनहित, नैतिकता आणि आरोग्य या तीन मुद्द्यांच्या आधारे एखादी कृती किंवा बाब रद्दबातल किंवा अवैध ठरवण्याची तरतूद या कलमात आहे. तथापि, तलाक ए बिद्दतला हे तिन्ही मुद्दे लागू होत नाहीत. त्यामुळे अँटर्नी जनरलचे याबाबतचे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही.

तलाक ए बिद्दतमुळे घटनेच्या १४, १५ व २१ या कलमांचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दाही वादींच्या वकिलांनी आग्रहाने मांडला आहे. वादींच्या या प्रतिपादनाचाही न्यायालयाने गांभीर्याने परामर्ष घेतला आहे. धर्म, जात, पंथ किंवा अन्य तत्सम कोणत्याही कारणावरून नागरिकांशी पक्षपाती किंवा भेदभावाचे वर्तन करम्यास शासनास १४ व १५ व्या कलमाने प्रतिबंध केला आहे, तर २१ व्या कलमाने धार्मिक स्वातंत्र्याची हमी दिली आहे. शासन त्यातही हस्तक्षेप करू शकत नाही. शरियत हा पर्सनल लॉच असून, कुराण, हदिथ, इज्मा व कियास हे त्याचे आधार हेत. त्यामुळे त्यात कोणालाही हस्तक्षेप करता येणार नाही. तलाक ए बिद्दत हा सुन्नी व त्यातही हनाफी पंथीयांच्या धार्मिक श्रद्धेचा भाग असल्याचे आम्ही आधीच स्पष्ट केल्याने या आधारवरही तलाक ए बिद्दत अवैध ठरवता येणार नाही.

तलाक ए बिद्दत अवैध ठरवण्याची मागणी करतानाच अॅटर्नी जनरलनी घटनात्मक नैतिकतेचा मुद्दाही उपस्थित केला होता. घटनेनेच धर्मनिरपेक्षतेचे तत्व अंगिकारलेल्या देशात महिलांना केवळ त्यांच्या धर्मामुळे भेदभावाची वागणूक दिली जाणे घटनात्मकदृष्ट्याही नैतिकतेचे ठरेल का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. एखाद्या शिष्ट धर्मातील महिलांना अन्य धर्मांतील महिलांपेक्षा कमी मानान किंवा आत्मसन्मानाने वागवले जाणे उचित ठरेल का? हिंदू, ख्रिश्चन, शिख, ज्यू, जैन अशा अन्य धर्मांतील पुरुष केवळ आपल्या लहरीखातर किंवा कोणतेही ठोस कारण नसताना पत्नीपासून विभक्त होऊ शकत नाहीत. विभक्त होण्यासाठीची कारणे पत्नीस देणे पतीस बंधनकारक असते किंवा पत्नीला अशी कारणे विचारण्याचा अधिकार अन्य धर्मांतील महिलांना आहे. तसेच, पतीने दिलेल्या कारणे अयोग्य असल्याचे सांगण्याचाही अधिकार अन्य धर्मांतील महिलांना आहे. तलाक ए बिद्दतमध्ये महिलांना असा अधिकार मिळत नाही किंबहुना कोणतेही ठोस किंवा सबळ कारण न देताही पत्नीला घटस्फोट देण्याचे अधिकार तलाक ए बिद्दतमुळे पुरुषांना मिळत असून, ही असमानताच महिलांसाठी अन्यायकारक ठरते. पतीने असा तलाक दिल्यास त्यांचा निकाह तत्काळ संपुष्टात येतोच, शिवाय या घटनेमुळे उदध्वस्त झालेल्या संबंधित महिलेला याविरुद्ध कोणाकडेही दाद मागता येत नाही. घटनेच्या १४ व्या कलमाने सर्व नागरिकांना समानतेचा मूलभूत अधिकार प्रदान केला आहे. सर्व धर्मांतील महिलांचा दर्जा समानच आहे, असाही या कलमाचा अर्थ आहे. पितृसत्ताक पद्धतीत महिलांना पुरुषांच्या दयेवर किंवा इच्छेवर आपले आयुष्य जगावे

लागते. घटनेच्या तिसऱ्या परिशिष्टात बहाल करण्यात आलेल्या समानता, लिंग समानता आणि लिंगभेदविरहित न्याय, अशा मुलभूत हक्क व अधिकारांवर यामुळे गदा येते. घटनेच्या १५ व्या कलमात लिंगभेद अमान्य ठरवण्यात आला आहे. तसेच, घटनेच्या २१ व्या कलमाने जगण्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. हा अधिकार सर्व धर्मांतील महिलांनाही सारख्याच प्रमाणात लागू आहे. लिंगसमानतेवर आधारलेला न्याय व लिंगभेदविरहित समाज निर्मिती हे घटनाकारांचे घटनात्मक उद्दिष्ट होते. घटनेच्या कलम ५१ ए (ई) मध्येही महिलांचा आत्मसन्मान जपण्यावरच भर देण्यात आला असून, महिलांना समान न्याय या तत्वाशी कोणतीही तडजोड केली जाऊ शकत नाही, याकडेही ॲटर्नी जनरलनी न्यायालयाचे लक्ष वेधले. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी सरला मुद्गल विरुद्ध केंद्र सरकार या खटल्यात न्यायालयाने दिलेल्या निकालाचेही संदर्भ दिले.

घटनेने बहाल केलेल्या मूलभूत अधिकारांतच पर्सनल लॉ अंतर्भूत केले गेले असल्याने या घटनात्मक अधिकारांचे पालन केले जाते किंवा नाही, या अधिकारांचे हनन होणार नाही, याची दक्षता घेणे हे न्यायालयाचे घटनात्मक कर्तव्य आहे. त्यामुळेच घटनात्मक नैतिकतेचा उपस्थित केला गेलेला मुद्दा आम्ही अमान्य ठरवत आहोत.

देशात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, पारशी, ज्यू, जैन अशा विविध धर्मीयांचे विवाह व घटस्फोटाबाबतचे कायदे स्वातंत्र्यपूर्व काळातच बनवले गेले आहेत आणि ते पर्सनल लॉच आहेत. त्यात वेळोवेळी केल्या गेलेल्या विधेयकांद्वारेच दुरुस्त्या वा सुधारणा केल्या गेल्या आहेत. त्यामुळे आताही या खटल्यातील मागणीप्रमाणे सुधारणा करायची असेल, तर ती फक्त विधेयकाद्वारेच (कायद्याद्वारेच) ती करता येईल, असे आमचे स्पष्ट मत आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १९४८ मध्ये संमत केलेल्या मानवी अधिकारांच्या जाहीरनाम्यावर भारताने सही केली आहे. तसेच, अन्य अनेक आंतरराष्ट्रीय सनदा, जाहीरनाम्यांवरही भारताने सही केली आहे. त्यातही लिंगसमानतेचा मुद्दा असून, महिलांना सन्मानाची व समानतेची वागणूक देण्याची हमी देण्यात आली आहे. तलाक ए बिद्दतसारख्या प्रथामुळे मुस्लिम महिलांना लिंगभेदाची व असमानतेची वागणूक मिळत आहे, याकडे इंदिरा जयसिंह, ॲटर्नी जनरल व अन्य वकिलांनी लक्ष वेधले. तसेच, हा मुद्दा लक्षात घेऊनही तलाक ए बिद्दत अवैध ठरवण्याची मागणी त्यांनी केली. तथापि, भारतीय घटनेनेही समानतेची हमी सर्व नागरिकांना दिली असून, तो सर्व नागरिकांचा मूलभूत अधिकार ठरवला आहे. देशातील सर्व धार्मिक समुदायांचे पर्सनल लॉ या मूलभूत अधिकारांत अंतर्भूत असल्याने या अधिकारांच्या रक्षणाची घटनात्मक जबाबदारी न्यायालयांवर आहे. त्यामुळे हा मुद्दाही यासंदर्भात ग्राह्य मानता येणार नाही. आंतरराष्ट्रीय जाहीरनामे किंवा सनदांचा विचारही भारतीय न्यायालये करतात. किंबहुना काही वेळा त्यांचा आदारही घ्यावा लागतो. तथापि, देशातील कायद्यांना छेद देणाऱ्या तरतुदी त्यात असतील, तर देशातील कायदेच प्रमाण मानले जातात, हे यासंदर्भातील काही खटल्यांत न्यायालयांनी दिलेल्या निकालांवरून स्पष्ट होते. पर्सनल लॉचा विषय जेव्हा उपस्थित होतो तेव्हा हेच तत्व लागू होते. तेथे आंतरराष्ट्रीय नियमावली, जाहीरनामे किंवा सनदा नव्हा, तर पर्सनल लॉच लागू होईल. त्यामुळेही वादींनी आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ्य मांडलेला आंतरराष्ट्रीय नियमावली किंवा जाहीरनाम्यांचा मुद्दा येथे गैरलागू ठरतो.

या सर्वातून खालील निष्कर्ष निघतात. ते असे

१) रशीद अहमद खटल्यात तलाक ए बिद्दतबाबत प्रिव्ही कौन्सिलने दिलेल्या निर्णयाचे फेरपरीक्षण होणे गरजेचे आहे.

२) तलाक ए बिद्दतबाबत, पापकर्म असले, तरी आचरणात आणण्यायोग्य (बॅड इम थिऑलॉजी, बट व्हॅलिड इन लॉ) तलाक प्रकार, अशी सुन्नीपंथातील हनाफी पंथियांसह सर्व मुस्लिम समाजाची धारणा असून, ही प्रथा शतकानुशतके चालत आली आहे, यावर या खटल्यातील सर्वच वकील व पक्षकारांचे एकमत आहे.

३) या खटल्यातील वादी व प्रतिवादी हदिथची वेगवेगळी व्हर्शन्स प्रमाण मानत असल्याने तलाक ए बिद्दतला हदिथची मान्यता आहे की नाही, याबाबतच या दोन्ही पक्षांत तीव्र मतभेद आहेत. त्यामुळे हदिथच्या प्रमाणतेचा व मान्यतेचा मुद्दा हाताळणे या न्यायालयास योग्य वाटत नाही.

४) तलाक ए बिद्दत हा हनाफी पंथियांच्या धार्मिक श्रद्धेचा भाग असून, १४०० वर्षांहून अधिक काळ ही प्रथा चालत आल्याने ती त्यांच्या पर्सनल लॉच्या अंतर्गत येणारी बाब असल्याचे मानणे स्वीकारार्ह आहे.

५) मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट १९३७ हा व्यक्तिगत कायदा नसून, त्याला घटनात्मक कायद्याचे स्वरूप असल्याचे अर्जदारांचे म्हणणे स्वीकारार्ह नसू, ते आम्ही फेटाळून लावत आहोत.

६) तलाक ए बिद्दतमुळे व्यापक जनहित, नैतिकता आणि सामाजिक स्वास्थ्यास कोणतीही बाधा येत नसल्याने यामुळे घटनेच्या २५ व्या कलमाचे उल्लंघन होत नाही. घटनेच्या १४, १५ व २१ या कलमांचेही यामुळे कोणतेही उल्लंघन होत नाही.

७) तलाक ए बिद्दत हा पर्सनल लॉचा भाग असल्याने त्याला मूलभूत अधिकाराचाच दर्जा आहे. त्यामुळे घटनात्मक नैतिकतेच्या संकल्पनेच्या आधारावर तो अवैध ठरवता येणार नाही.

८) देशातील पर्सनल लॉमध्ये केवळ कायदे मंडळाच्या हस्तक्षेपातूनच सुधारणा किंवा दुरुस्त्या करता येतात. एखाद्या धर्मातील सामाजिकदृष्ट्या अनिष्ट प्रथा किंवा परंपरांना अशा कायद्यांद्वारेच रद्दबातल ठरवता येऊ शकते. घटनेच्या २५ (२) आणि ४४ व्या कलमाने तसे कायदे करण्याचे अधिकार कायदे मंडळाला दिले आहेत. तलाक ए बिद्दत अवैध किंवा रद्दबातल ठरवण्यासाठी हीच कार्यपद्धती अवलंबली जावी.

९) तलाक ए बिद्दत हा पर्सनल लॉचा भाग असून, घटनेच्या २५ व्या कलमाद्वारे तो संरक्षित असल्याने आंतरराष्ट्रीय कायदेकानू, नियमावली वा जाहीरनाम्यांचा मुद्दा यासंदर्भात गैरलागू ठरतो.

या प्रश्नावर सध्या सर्व देश बाह्या सरसावून बसला आहे. वैचारिकदृष्ट्या पापकर्म असलेली तलाक ए बिद्दतची प्रथा रद्दबातल ठरवली जावी, अशी आग्रही मागणी देशातील सर्व मुस्लिम महिला संघटना करत आहेत. तलाक ए बिद्दतमुळे मुलभूत अधिकार व घटनात्मक नैतिकतेचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा मांडत भारत सरकारनेही तलाक ए बिद्दत घटनाबाह्य ठरवण्याची आग्रही मागणी केली आहे. देशभरातील वृत्तपत्रे व माध्यमांमधूनही या विषयावर जोरदार चर्चा झाली. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान बहुतेक वकिलांनी तलाक ए बिद्दत ही अनिष्ट, अयोग्य बाब असल्याचे मत मांडले. काहींनी अधिक कडक शब्दांत यावर टीका केली.

या खटल्यात आम्ही या निष्कर्षावर आलो आहोत, की तलाक ए बिद्दत हा सुन्नींमधील हनाफी पंथियांच्या धार्मिक श्रद्धेचा भाग असून, ही प्रथा सुमारे १४०० वर्षांपासून चालत आली आहे. त्यामुळे ती पर्सनल लॉचाच एक भाग आहे. घटनेच्या कलम २५ मधील तरतुदींचे यामुळे उल्लंघन होते का, याचाही परामर्ष आम्ही घेतला आणि असे कोणतेही उल्लंघन होत नसल्याच्या निष्कर्षाप्रत आम्ही आलो आहोत. आम्ही याही निष्कर्षाप्रत आलो आहोत, की हा पर्सनल लॉचा भाग असून, घटनेच्या २५ व्या कलमाद्वारेच तो संरक्षित आहे.

धर्म हा श्रद्धेचा विषय आहे, तर्काचा नव्हे. एखाद्या धर्माच्या अंगभूत चालीरितींकडे केवळ समानतेच्या तत्वाच्या भूमिकेतून पाहावे, अशी भूमिका न्यायालयांना घेता येणार नाही. प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्मानुसार आचरण करण्याचे आणि धार्मिक परंपरांच्या पालनाचे अधिकार घटनेनेच दिले आहेत. तसेच, आधुनिक जगातही या अधिकाराला अन्य कोणीही (मग ते त्याच धर्मातील बुद्धिप्रामाण्यवादी असले तरी) आव्हान देऊ शकणार नाही, अशी हमीही घटनेने दिली आहे. याच धार्मिक श्रद्धांचे जतन करण्याची मुभा घटनेने दिली असून, कलम २५ अन्वये त्यास संरक्षणही दिले आहे.

घटनेतील अन्य काही कलमांचा दाखला देत अर्जदारांनी तलाक ए बिद्दतबाबत घटनात्मक नैतिकतेचा मुद्दा उपस्थित केला. तथापि, हा विषय पर्सनल लॉशी निगडीत असून, त्यास घटनेनेच संरक्षण दिले असल्याने हा मुद्दा आम्ही फेटाळून लावत आहोत. या खटल्यात अर्जदारांच्या वतीने मुस्लिम महिलांची व्यथा नेमकेपणाने व प्रभावीपणे न्यायालयापुढे मांडली गेली. मुस्लिम महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी ही उत्तम संधी आहे आणि ती वाया जाऊ नये, असेच आम्हालाही प्रारंभी वाटत होते. तथापि, या प्रश्न अशा पद्धतीने हाताळता येणार नाही, याचीही आम्हाला जाणीव आहे. घटनाकारांनी पूर्ण विचार करूनच घटनेत धर्माशी निगडीत मुद्द्यांचा अंतर्भाव केल्याची जाणीव आम्हाला असून, घटनात्मक तरतुदी काय आहेत, हे पाहूनच आम्ही निर्णय घेणे आवश्यक आहे. घटनेने संरक्षण दिलेल्या बाबी आम्ही अवैध ठरवू शकत नाही किंवा त्या कायदेशीरदृष्ट्या स्वीकारण्याजोग्या नाहीत, असेही सांगू शकत नाही. उलट अशा बाबींचे संरक्षण करम्याची जबाबदारी आमच्यावर आहे. त्यामुळे अर्जदारांची मागणी मान्य केल्यास, ते घटनेच्या २५ व्या कलमाचे उल्लंघन ठरेल अर्जदारांची ही मागणी मान्य केल्यास त्याचे दूरगामी परिणाम संभवतात. आमच्या या म्हणण्यामागे निश्चित कारणे आहेत. कारण तलाक ए बिद्दतप्रमाणेच तलाक ए एहसान व तलाक ए

हसन हे प्रकारही घटनाबाह्य ठरवले जावेत, अशी मागणी ॲटर्नी जनरलनी आपली बाजू मांडताना केली आहे. मुस्लिम समाजातील बहुपत्नीकत्व आणि हलाला या प्रथांनाही न्यायालयात आव्हान दिले गेले असून, याबाबतचे खटलेही न्यायालयात दाखल आहेत. बुद्धिप्रामाण्यवादी कोणत्या गोष्टींना आव्हान देतील, हे यातून सहज समजण्यासारखे आहे. धार्मिक परंपरा आणि पर्सनल लॉला धक्का लागणार नाही, याकडे आम्हाला सतत लक्ष द्यावे लागणार आहे. कोणतेही न्यायालय, अगदी योग्य पद्धतीने प्रयत्न करूनही, धार्मिक श्रद्धा नाकारली जावी, असे कधी सांगू शकेल का? या खटल्यात तशीच मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे. तोंडी तीनदा तलाकचा उच्चार करून घटस्फोट देण्याची पद्धत रद्दबातल ठरवावी, ही अशीच मागणी आहे. धार्मिक परंपरा किंवा पर्सनल लॉशी संबंधित एखादा प्रश्न उपस्थित झाल्यास, पुरोगामी किंवा निधर्मवादी दृष्टिकोनातून न्यायालये त्यावर निकाल देऊ शकत नाहीत, हेच अशा खटल्यांतील आधीच्या निकालांतूनही पुरेसे स्पष्ट झाले आहे. एखादी धार्मिक परंपरा किंवा प्रथा पुरोगामी आहे, की प्रतिगामी हे ठरवण्याचा अधिकार न्यायालयांना नाही. धर्म, त्यतील प्रथा, परंपरा आणि पर्सनल लॉ जसा आहे, तसा त्याचा स्वीकार करणे आवश्यक आहे. त्यात खोट काढण्याचे अधिकार घटनेने न्यायालयांना दिलेले नाहीत. उलट पर्सनल लॉच्या संरक्षणाची जबाबदारी घटनेच्या २५ व्या कलमाने न्यायालयांवर सोपवली आहे. त्यामुळे पर्सनल लॉमध्ये कोणत्याही कारणास्तव न्यायालयीन हस्तक्षेप करता येणार नाही. एखाद्या प्रकरणात, समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याची संधी दिसत असल्याचे वाटले, तरीही न्यायालयाने याबाबत काही निर्बंध पाळलेच पाहिजेत.

जगातील मुस्लिम देशांनी व जेथे मुस्लिम बहुसंख्येने आहेत, त्या देशांनी तलाक ए बिद्दत कायदेशीरदृष्ट्या रद्दबातल ठरवला आहे. देशात ही प्रथा घटनाबाह्य ठरवायची असेल किंवा ती रद्दबातल ठरवायची असेल, तर त्यासाठी कायदा करणे हाच एकमेव मार्ग आहे. धर्म आणि श्रद्धा कायद्याच्या कक्षेत येत नसल्याचा मुद्दा या खटल्यातील प्रमुख प्रतिवादी असलेल्या ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने मांडला असून, तो आम्ही ग्राह्य मानतो. त्याचवेळी यासंदर्भात एखादा कायदा केल्यास हा प्रश्न निकाली निघू शकतो. एखाद्या विषयावर कायदा करा, असा सल्ला न्यायसंस्थेने कायदेमंडळाला देणे उचित नाही, हे आम्ही समजू शकतो. परंतु, हे प्रकरण काहीसे निराळे आहे. अर्जदारांनी केलेल्या मागणीस पाठिंबा देत भारत सरकारने न्यायालयापुढे आपली बाजू मांडली आहे. अर्जदारांची मागणी योग्य असल्याचे भारत सरकारचे मत असल्याचे सरकारने मांडलेल्या भूमिकेवरून वाटते. त्यासाठी त्यांनी न्यायसंस्थेचा दरवाजा ठोठावला आहे. तथापि, हा न्यायसंस्थेच्या नव्हे, तर सरकारच्या अखत्यारितील विषय आहे. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले असून, यासंदर्भात बोर्ड कोणती पावले उचलत आहे, याची माहिती देण्यात आली आहे. आपला निकाह तलाक ए बिद्दतनुसार अचानक संपुष्टात आणला जाणार नाही, याची हमी प्रत्येक मुस्लिम पुरुषास निकाहनाम्यात द्यावी लागेल. तशा स्वरुपाच्या सूचना बोर्डाचे संकेतस्थळ, पत्रके, वृत्तपत्रे व अन्य माध्यमांतून दिल्या जाणार असल्याचेही या प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे. तलाक ए बिद्दतचा प्रकार टाळण्याचाच

बोर्डाचा यामागे हेतू आहे, हेही यातून स्पष्ट होते. तसेच, अर्जदाराचीही तीच मागणी असून, ती यामुळे पूर्ण होऊ शकते.

एखाद्या विषयात कायदा करण्याचे आदेश सरकारला देण्याचे अधिकार घटनेच्या १४२ व्या कलमाने न्यायालयांना दिले आहेत. त्याच आधारे आम्ही सरकारला असा कायदा करण्याचे आदेश देत आहोत. मुस्लिम पर्सनल लॉमध्ये (शरियत) सुधारणा घडवून आणण्याची संधी त्यामुळे सरकारला मिळणार आहे. जगातील मुस्लिम देशांनी आणि काही बिगर मुस्लिम देशांनी या दृष्टीने आधीच काही पावले टाकून सुधारणा घडवून आणल्या असताना भारत त्यात मागे राहाता कामा नये, हीच आमची यामागची भूमिका आहे. देशातील सर्व राजकीय पक्षांनी आपले राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून असा परिपूर्ण कायदा बनवण्यात आपले योगदान द्यावे, असेही आम्ही सुचवत आहोत.

असा कायदा अस्तित्वात येईपर्यंत मुस्लिम पुरुषांना तलाक ए बिद्दतद्वारे पत्नीला तलाक देण्यास प्रतिबंध करत आहोत. हे प्रतिबंध पहिल्या टप्प्यात सहा महिन्यांपर्यंत कायम असतील. या सहा महिन्यांच्या काळात विधेयक तयार करण्याची सुरू झाल्यास किंवा असा कायदा झाल्यास हे प्रतिबंध कायम राहतील.

न्या. कुरियन जोसेफ यांच्या निवाड्यातून

मुस्लिम विमेन्स क्वेस्ट फॉर इक्वॅलिटी (वादी) विरुद्ध जमियात उलेमा ए हिंद व अन्य (प्रतिवादी)

एकेकाळी तात्त्विकदृष्ट्या वाईट असलेली गोष्ट कायद्याच्या दृष्टीने चांगली होती. परंतु, शरियत हाच पर्सनल लॉ (व्यक्तिगत कायदा) आहे हे जाहीर झाल्यानंतर कुराणदृष्ट्या जे चूक आहे, ते कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे का, असाच प्रश्न या प्रकरणात विचारात घ्यावा लागणार आहे. त्यामुळे तोंडी तीनदा तलाकला कायदेशीर मान्यता आहे का, याच प्रश्नाचे उत्तर या प्रकरणात शोधावे लागणार आहे. तोंडी तीनदा तलाकला कायदेशीर मान्यता नाही, हे शमीम आरा विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार व अन्य या खटल्यात न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता हाच निकाल महत्त्वाचा मानला जातो आहे.

मुस्लिम समाजातील अनिष्ट रुढी, परंपरा व प्रथा रोखण्यासाठी मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट १९३७ लागू करण्यात आला. त्यातील कलम २ हे या वादाचे मूळ आहे. या कलमात निकाह, तलाक आदी बाबींचा समावेश आहे. रूल ऑफ डिसिजन तत्वावर शरियत लागू झाला असला, तरी तलाकबाबतच्या कोणत्याच तरतुदी शरियतमध्ये नाहीत. डिझॉल्यूशन ऑफ मुस्लिम मॅरेज ॲक्ट १९३९ मध्ये संमत केला गेला आणि त्यात याबाबतच्या तरतुदी दिल्या गेल्या आहेत. शरियत हा तलाकचे निर्देशन करणारा कायदा नाही, या सरन्यायाधीशांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. या उलट, शरियतनुसारच तोंडी तीनदा तलाक दिला जात असल्याने घटनेच्या कलम १४ चे त्यामुळे उल्लंघन होते किंवा कसे, यावर विचार केला जावा, या न्या. नरिमन यांच्या मताशी मी असमहत आहे. कसेही असले, तरी घटनात्मक लोकशाही असलेल्या देशात जुलमी कायद्यांना स्थान असू नये, असेही माझे मत आहे.

शरियत कायदा काय आहे हे जाणून घेणे येथे अगत्याचे आहे. कोणत्याही मुस्लिम कायद्याचे कुराण, हदिथ, इज्मा आणि कियास हे चार प्रमुख स्त्रोत आहेत. यातील कुराण हा सर्वाधिक महत्त्वाचा व प्रमुख असा स्रोत आहे. त्यामुळे कुराणात तलाकबाबत काय म्हटले आहे, ते पाहणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. कुराणात तलाकचा उल्लेख आहे. मात्र, असा तलाक देतानाही पती पत्नीतील मतभेद मिटवण्यावरही त्यात भर दिला आहे. दोघांतील मतभेद मिटण्याची कोणतीही शक्यता नसल्यास किंवा समेट घून येण्याची शक्यता नसल्यासच तलाक घेतला जावा, असे कुराणात नमूद करण्यात आले आहे. तोंडी तीनदा तलाकमध्ये अशा समेटाची संधीच दिली जात नसल्याने तो कुराणच्या तत्वांविरुद्ध ठरतो पर्यायाने शरियतचेही त्यामुळे उल्लंघन होते. यापूर्वी अशाच स्वरुपाच्या खटल्यांत विविध उच्च न्यायालयांनी हेच मत उचलून धरले आहे. ठोस व सबळ कारण असल्यासच तलाक दिला जाऊ शकतो. तसेच, तलाक देण्यापूर्वी पती व पत्नीत मध्यस्थांच्या उपस्थितीत समेटाचा प्रयत्न केला गेलेला असावा. पतीकडून एक व पत्नीकडून एक असे दोन मध्यस्थ असावेत. पती पत्नीत समेटाची शक्यता नसल्यासच तलाक दिला जावा, असा स्पष्ट निकाल शमीम आरा खटल्यात दिला गेला आहे. याच निकालाच्या आधाराने तोंडी तीनदा तलाक हा शरियतचे उल्लंघन करणारा असल्याचे निकाल उच्च न्यायालयांनी दिले आहेत.

ओयूर नझीर विरुद्ध शेमिमा खटल्यात केरळ उच्च न्यायालयाचे न्या. मुश्ताक यांनी याच शमीम आरा खटल्याचा संदर्भ देत तोंडी तीनदा तलाक नाकारला आहे.

हे सर्व संदर्भ लक्षात घेता, तोंडी तीनदा तलाक हा पर्सनल लॉचा अंगभूत घटक आहे, या सरन्यायाधीशांच्या मताशी मी असहमत आहे.

एखाद्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य घटनेने दिले असून, तसा मुलभूत अधिकारही घटनेने बहाल केला आहे. व्यापक जनहित, नैतिकता आणि सामाजिक स्वास्थ्यास बाधा येणार नाही, अशा पद्धतीने धर्मपालनास घटनेनेच मुभा दिली आहे. तसेच, नागरिकांच्या मुलभूत हक्क व अधिकारांच्या रक्षणाची जबाबदारी शासन व न्यायव्यवस्थेवर सोपवली आहे, या सरन्यायाधीशांच्या मताशी मी सहमत आहे. तथापि, तोंडी तीनदा तलाक ही धार्मिक परंपरा असल्याच्या सरन्यायाधीशांच्या मताशी मी पूर्णपणे असहमत आहे. विशेषत: ही परंपरा चुकीची असून, तिला कोणतीही वैधता नाही आणि जी कायद्यानेही संमत नाही, अशी परंपरा केवळ दीर्घकाळ चालू असल्याने ती धार्मिक आहे असे मानण्याच्या मताशी मी असहमत आहे. शरियतविरोधी सर्व परंपरा रद्दबातल ठरवण्यासाठी शरियत कायदा १९३७ मध्ये संमत केला गेला. कुराणात नमूद नसलेल्या किंवा कुराणाची मान्यता नसलेल्या कोणत्याही प्रथेस, परंपरेस किंवा बाबीस या कायद्यामुळे घटनात्मक संरक्षण असणार नाही. त्यामुळेही तोंडी तीनदा तलाकला घटनात्मक संरक्षण देण्याच्या सरन्यायाधीशांच्या मताशी मी असहमत आहे.

अशा स्वरूपाचा एखादा खटला पुढे आला, की दरवेळी अन्य घटनात्मक अधिकारांविरुद्ध धर्म असा संघर्ष उभा केला जातो. या दोन्हींत समन्वय साधणे शक्य आहे आणि ते केवळ पूरक कायद्यांद्वारेच साध्य होऊ शकेल. अर्थात, असा कायदा करताना घटनेने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याचा संकोच होणार नाही, याचीही दक्षता घेतली गेली पाहिजे. शमीम आरा खटल्यात मी हेच मत मांडले होते. कुराणाने जे वाईट ठरवले आहे, ते शरियतमध्ये चांगले ठरवता येणार नाही, दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर नैतिकदृष्ट्या जे वाईट असते ते कायदेशीरदृष्ट्याही वाईटच असते.

न्या. रोहिंग्टन फली नरिमन व
न्या. उदय उमेश लळीत या खंडपीठाच्या निवाड्यातून

मुस्लिम विमेन्स क्वेस्ट फॉर इक्वॅलिटी (वादी) विरुद्ध जमायत उलेमा ए हिंद (प्रतिवादी)

शायरा बानो (वादी) विरुद्ध केंद्र सरकार व अन्य, महिला व बालविकास मंत्रालय व अन्य (प्रतिवादी)

आतिया साबरी (वादी) विरुद्ध केंद्र सरकार व अन्य (प्रतिवादी)

आफ्रिन रहमान (वादी) विरुद्ध केंद्र सरकार (प्रतिवादी)

गुलशन परवीन (वादी) विरुद्ध केंद्र सरकार (प्रतिवादी)

इशरत जहाँ (वादी) विरुद्ध केंद्र सरकार (प्रतिवादी)

मा. सरन्यायाधीशांनी आपल्या निकालात व्यक्त केलेल्या काही मतांशी मी असहमत आहे.

तोंडी तीनदा तलाक देण्याच्या प्रथेस अवैध व घटनाबाह्य ठरवण्याची मागणी अर्जदार करत असून, त्याबाबत न्यायालयात विविध वकिलांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले आहे आणि सरन्यायाधीशांच्या निकालात त्याचा सविस्तर परामर्षही घेण्यात आला आहे. तोंडी तीनदा तलाक ही मुस्लिम महिलांच्या मुलभूत हक्कांची पायमल्ली ठरते, असे म्हणणे वादींतर्फे मांडले गेले आहे. सध्याच्या आधुनिक युगात अशा प्रथा अयोग्य असल्याचेही वादींचे म्हणणे आहे आणि केंद्र सरकारनेही वादींच्या या मताला पाठिंबा दर्शवला आहे.

लैंगिक भेदभावाचा मुद्दा अर्जदारांच्या वतीने अग्रभागी ठेवण्यात आला आहे. तोंडी तीनदा तलाकला शरियतची मान्यता असली, तरी मुस्लिम महिलांच्या मुलभूत अधिकार व हक्कांचे त्यामुळे पायमल्ली होत असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड व अन्य प्रतिवादींनी अर्जदारांच्या या म्हणण्यास विरोध दर्शवला असून, त्यासाठी नरसू आप्पा माळी खटल्यात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा सदर्भ त्यासाठी प्रतिवादी देत आहेत. व्यक्तिगत कायदे हे मुलभूत हक्कांच्या कक्षेबाहेर असल्याने त्यात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही. सामाजिक कल्याण व सुधारणा घडवून आणण्यासाठी तोंडी तीनदा तलाक रद्दबातल ठरवण्यासाठी घटनेच्या २५ (२) कलमातील तरतुदीनुसार कायदा केला गेला पाहिजे, असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत) ॲप्लिकेशन ॲक्ट १९३७ च्या कलम २ ने तोंडी तीनदा तलाकला संमती दिली असून, शरियतमधील हे कलम २ अवैध ठरवले जावे, अशी वादींची मागणी आहे. लॉ बोर्डाचा या प्रतिपादनासही आक्षेप आहे. रुढी, परंपरा रोखण्याच्या हेतूने तयार शरियत कायदा तयार करण्यात आला असून, त्यातील एक कलम तलाकविषयी आहे. त्याचा अर्थ याच कलमानुसार तोंडी तीनदा तलाक दिला जातो, असा होत नाही. तोंडी तीनदा तलाक हा धार्मिक परंपरेचा भाग असल्याने घटनेच्या कलम १३ (१) मध्ये त्याचा समावेश होऊ शकत नाही, असेही प्रतिवादींचे म्हणणे आहे. तलाकच्या प्रकारांपैकी फक्त तोंडी तीनदा तलाक देण्याच्या प्रथेलाच न्यायालयात आव्हान दिले गेल्याने यातून काही प्रश्न उपस्थित होत आहेत.

शिया आणि सुन्नी या मुस्लिमांतील दोन पंथांपैकी सुन्नीपंथीयांतच तोंडी तीनदा तलाकची प्रथा शतकातुशतके चालत आली आहे. सुन्नींमध्येही हनाफी, मलिकी, शाफी आणि हानबाली हे

चार महत्त्वाचे उपपंथ असून, त्यातही हनाफी पंथीयांतच प्रामुख्याने ही प्रथा पाळली जात असल्याचे दिसून येते. देशात हनाफी पंथीयांची बहुसंख्या असल्याने ही प्रथा आपल्याकडे वर्षानुवर्षे पाळली जात असल्याचे निदर्शनास येते.

इस्लाममध्ये निकाह हा सुद्धा एक प्रकारचा करार आहे आणि अन्य कोणत्याही कराराप्रमाणे हा करारही काही विशिष्ट कारणांमुळे किंवा विशिष्ट परिस्थितीत संपुष्टात आणला जाऊ शकतो. कोणतेही विशेष धार्मिक विधी न पार पाडताही निकाह होऊ सकतो, तसेच निकाह जाहीर करण्याची गरज नसते. मात्र, धार्मिक समारंभातून निकाह जाहीर केला जातो, हे खरे असले, तरी तशी खोणतीही धार्मिक अट निकाहला नाही, हेही खरे. प्रेषित महंमदांच्या मते घटस्फोट किंवा तलाक ही देवाला न आवडणारी गोष्ट आहे. तरीही काही विशिष्ट कारणांसाठी तलाकला त्यांनी मान्यता दिली. पुढे कारणातही त्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तलाक ए अहसान, तलाक ए हसन असे तलाकचे काही प्रकार इस्लामिक कायद्यांत नमूद आहेत, हनाफी पंथीयांत तलाक उस सुन्नत व तलाक उल बिद्दत अशा दोन प्रकारांनी तलाक दिला जातो. परंपरागत (सुन्नत) नियमांनी दिला जाणारा तो तलाक उस सुन्नत म्हणून ओळखला जातो. त्यात तलाक ए एहसान व तलाक ए हसन हे प्रकार येतात. तलाक उल बिद्दत हा नवा किंवा काहीसा गैरप्रकार असून, तो इस्लामच्या उदयानंतर दुसऱ्या शतकात प्रचलित झाला. तलाक ए एहसान व तलाक ए हसन या दोन प्रकारांत पती पत्नीत समेटाचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी विशिष्ट कालावधीची मुदत (इद्दत) दिली जाते. या कालावधीत समेट झाल्यास पती पत्नी पुन्हा एकत्रही येऊ शकतात. तलाक उल बिद्दतमध्ये अशी कोणतीही इद्दत दिली जात नाही. तसेच, तोंडी तीनदा तलाक म्हटले तरी तत्काळ निकाह संपुष्टात येतो. (तलाक उल बिद्दतमध्ये तीनदा तलाकचा उच्चार करणे हेही फारसे बंधनकारक नाही, तर पत्नीला कायमस्वरूपी तलाक देण्याचा इरादा त्यातून व्यक्त केला जातो.) तालक उल बिद्दतमधील या तत्काळ निकाह संपुष्टात येण्यासच अर्जदारांनी आक्षेप घेतला असून, यामुळेच मुस्लिम महिलांच्या हक्कांची, त्यांच्या आत्मसन्मानाची पायमल्ली होत असल्याचे अर्जदारांचे म्हणणे आहे.

त्यावर, तलाक ए बिद्दत शरियतनुसार (म्हणजे त्यातील कलम २ नुसार) दिला जात नाही, अशी भूमिका मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने मांडली आहे. तथापि, याबाबत उच्च न्यायालयांनी दिलेल्या निकालांवरून हे स्पष्ट होते, की तलाक ए बिद्दत हा शरियतचाच एक भाग आहे. देशात सुन्नी मुस्लिमांसाठी जेव्हा शरियत कायदा (१९३७) लागू झाला तेव्हाच त्यातील सर्व कलमे (कलम २) सुन्नी पंथीयांनाही लागू झाली. या कलम २ नुसार ज्या खटल्यात दोन्ही पक्षकार मुस्लिम असतील तेथे (तलाक ए बिद्दतबाबतही) रूल ऑफ डिसिजन लागू होतो. ही बाब ध्यानात घेता मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाची भूमिका स्वीकारता येणार नाही.

घटना अस्तित्वात येण्यापूर्वीच शरियत (१९३७) अस्तित्वात आला होता. घटना अस्तित्वात आल्यानंतरही आधीचे सर्वच कायदे रद्द झाले असे नाही. आधी लागू असलेल्या, पण घटनेच्या तत्वांशी विसंगत असलेल्या कायद्यांचा फेरविचार करम्याची व त्यात सुधारणा करण्याची किंवा ते रद्दबातल ठरवण्याची तरतूद घटनेतच करण्यात आली असल्यानेच शरियतमधील (१९३७) काही कलमांचा घटनेतील १३ (१) कलमातील तरतुदीनुसार फेरविचार करता येणे शक्य आहे.

तलाक ए बिद्दत हा धार्मिक श्रद्धा व परंपरेचा भाग असल्याने घटनेच्या २५ व्या कलमाने तो संरक्षित असल्याचा मुद्दाही आग्रहाने मांडला गेला आहे. धार्मिक श्रद्धा, परंपरा आणि आवश्यक धार्मिक कर्तव्यांबाबत जावेदविरुद्ध हरियाणा सरकार खटल्यात बराच उहापोह झाला आहे. तलाक उल बिद्दत हे आवश्यक धाम्रिक कर्तव्य ठरत नाही, असे उच्च न्यायालयाने त्या खटल्यात स्पष्ट केले आहे. तलाक उल बिद्दत नैतिकदृष्ट्या अयोग्य, पण अंमलात आणण्यासाठी योग्य (बॅड इन थिऑलॉजी, बट गुड इन लॉ) असल्याचे हनाफी विचारवंतही मानतात. त्यामुळेही याबाबत फेरविचार केला जाणे गरजेचे आहे. अर्जदारांनी घटनेच्या कलम ३२ नुसार न्यायालयाकडे धाव घेतली असताना, वरील सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, या प्रकरणात घटनेने बहाल केलेल्या मूलभुत हक्कांची पायमल्ली होते की नाही, हे आम्ही ठरवू शकत नाही, त्यासाठी तुम्ही कायदे मंडळाकडे जा आणि तुमचे उत्तर मिळवा, असे आपण अर्जदारांना सांगणार का, असा प्रश्नही यातून निर्माण झाला आहे.

तलाक उल बिद्दत (तोंडी तीनदा तलाक) हा निकाह तत्काळ संपुष्टात आणणारा प्रकार असल्याचे या खटल्यातील सुनावणीतून स्पष्ट झाले आहे. कोणतेही ठोस वा सबळ कारण न देताही, केवळ रागाच्या भरात किंवा एकाद्या लहरीतही आपल्या पत्नीला तत्काळ तलाक देण्याचा एकतर्फी अधिकार मुस्लिम पुरुषास तलाक उल बिद्दतमुळे मिळाला आहे. तलाकच्या अन्य प्रकारांत ज्याप्रमाणे पत्नीला किंवा पती व पत्नीला समेटाची संधी दिली जाते, तशी संधीही तलाक उल बिद्दतमध्ये नाकारली जाते. त्यामुळेच तलाक उल बिद्दत हा जुलमी व अन्यायकारक प्रकार असून, घटनेतील १४व्या कलमात नमूद केलेल्या मूलभूत हक्कांची पायमल्ली करणारा ठरतो. घटनेच्या कलम १३ (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे तलाक उल बिद्दत हा लागू असलेला कायदा (लॉज इन फोर्स) असल्याने तो अवैध ठरवला जावा, असे आम्हाला वाटते.

महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

राज्य महिला आयोगाची 'सुहिता' हेल्पलाइन
०२२-७४७७७२२४२४

महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे
०२०-२६०५०१९१ (www.punepolice.gov.in)

पुणे नियंत्रण कक्ष
०२०-२६१२६२९६

पुणे महिला साह्य कक्ष
०२०-२६२०८३४१

पुणे सखी हेल्पलाइन
०२०-२४४८४५३५

आय लव्ह मुंबई आणि सकाळ
८८८८८०९३०६

पुणे गुन्हे शाखा कक्ष
०२०-२६११२२२२,
२६२०८२९५

हेल्पलाइन
१८१

स्त्री सन्मान हेल्पलाइन
०२२-८८८८८०९३०६

नवी दिल्ली हेल्पलाइन
१८२

आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९-ब, ४२-ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्रुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार म हिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंम लबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ - २६५९०८७८
'सुहिता' हेल्पलाइन - ७४७७७२२४२४

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com